प्रेस नोट दि.०६/०७/२०१९

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांचे कडून कोल्हापूर जिल्हयातील साळवण येथील अे.टी.एम. फोडीच्या गुन्हयातील फरारी आरोपींना सिंधुदुर्ग जिल्हयातुन शिताफीने अटक.

---

दिनांक ०५/०७/२०१९ रोजीरात्री ११.०० वाजताचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी हे विजयदुर्ग पोलीस ठाण्याच्या हध्दीत घडलेल्या घरफोडीच्या गुन्हयांच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना फोंडाघाट स्टेट बँकेच्या अे.टी. एम. जवळ बाजारपेठ येथे २ व्यक्ती संशयास्पद फिरत असल्याचे दिसल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता, त्यांनी आपली नांवे १. कृष्णा नारायण गर्जे, वय-३२ रा. सांगवी ता. पाटोदा जिल्हा बिड २. भागवत शंकर गर्जे , वय-२७ रा. बिड त्यांचे हातात बारदानात गुंडाळलेल्या स्थितीत लोखंडी रॉड व स्क्रु ड्रायव्हर दिसून आले. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी आपण कोल्हापुर जिल्हयातील साळवण येथील अे.टी.एम. फोडल्याचे सांगितलेले आहे. तसेच यापुर्वीही त्यांचेवर बीड जिल्हयात गुन्हे दाखल असल्याचे समजते. लवकरच त्यांना कोल्हापूर येथील पोलीस वर्ग करुन घेऊन जाणार आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. दिक्षित गेडाम, अपर पोलीस अधीक्षक श्री . निमित गोयल, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेतील पोलीस उपनिरीक्षक श्री. फडणीस , पोलीस नाईक - कृष्णा केसरकर, पोह/३१६ कोयंडे . पोलीस कॉन्स्टेबल इंगळे , पोलीस कॉन्स्टेबल तोरसकर ३. पोलीस कॉन्स्टेबल खाडये यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

---